# कवि बोरकरांची कथा

**- डॉ. बाळकृष्णजी कानोळकर**

साहित्याविषयीची अनौपचारिक चर्चा करत असताना प्रा. एम् एस्. नाडकर्णी एकदा मला म्हणाले होते की ''बोरकरांच्या कवितेवर आतापर्यंत झाला आहे. तेवढा अभ्यास पुरेसा आहे.'' आता खरं तर त्यांच्या गद्य साहित्याचा अभ्यास व्हायला हवा. कुणीतरी गोमंतकीय विद्यार्थी अभ्यासकाने तो करायला हवा असे मला वाटते. प्रा. नाडकर्णींच्या मताशी मीही सहमत आहे. कवी बोरकरांना पोयट म्हटवून घेण्यात भुषण वाटत असे. अंगावरील शालीप्रमाणे ते घेऊन ते मिरवत असत हे खरंच आहे. परंतु मराठीतल्या या श्रेष्ठ कवीने निर्माण केलेले गद्य साहित्य- कथा, कादंबरी, लघुनिबंध इत्यादी ही चांगले कसदार आहे. त्याच्या अभ्यासाविना बोरकरांच्या साहित्याचे मूल्यमापन अपुरे ठरेल. बोरकरांची साहित्यिक उंची समजून घ्यायचीअसेल तर असा अभ्यास आवश्यक आहे.

कवी बोरकरांनी कवितेच्या बरोबरीने अल्पप्रमाणात का होईना, कथालेखन ही केलेले आहे. ते म्हणतात तशी 'नवयुग साप्ताहिका' च्या गोमंतक विशेषांकाकरिता लिहिलेली 'सुताराची सून' (१९४७) ही त्यांची पहिली कथा नव्हे. तत्पूर्वी दहा वर्षे अगोदर त्यांची पहिली कथा 'ओझरती झळ' ही १९३७ साली 'कुळागर' मधून प्रसिद्ध झालेली होती. पुढे मग त्यांनी १९४७ ते १९६० पर्यंत बऱ्याचशा कथा सातत्याने लिहिल्या. त्या मुंबई-पुणे मुक्कामी. त्यांच्या या कथांपैकी काही निवडक कथांचा एक संग्रहही १९६० मध्ये पुण्याच्या 'साधना' मासिकाने 'प्रियदर्शनी' या नावे प्रसिद्ध केला. पण पानशेतच्या पुरात संग्रहाची सर्व आवृत्तीच वाहनू गेली. 'पुढे उपरांतच्या काळात मला आवरता न आलेल्या काही कथा मी लिहून गेलो', असे ते सांगतात. या नव्या कथांत पूर्वीच्या काही जुन्या कथांची ('प्रियदर्शनी' मधील) भर घालून त्यांचा दुसरा संग्रह 'समुद्रकाठची रात्र' १९८१ मध्ये निघाला.

बोरकरांच्या 'प्रियदर्शनी' या पहिल्या संग्रहात 'सोनकेळ', 'प्रियदर्शनी', 'देवीचे दान', 'घराण्याची अब्रु', 'दोन बळी', 'रक्ताचा निवाडा', 'सुताराची सून', 'ते कर मन्मातेचे', 'निरक्षराचा प्रश्न', 'समुद्रकाठची रात्र', 'पूर्णविराम!', 'पांघरूण', 'दृष्ट' या कथांचा समावेश करण्यात आलेला होता. त्यांपैकी बऱ्याच कथा त्यांच्या दुसऱ्या संग्रहातून पुनःप्रसिद्ध करण्यात आल्या. त्यातून जुन्या-नव्या अशा १६ कथा संग्रहित करण्यात आल्या आहेत. त्यात 'रक्ताचा निवाडा' व 'दोन बळी' या फक्त दोन कथा वगळून 'लामण दिवा', 'आकाशाची दौलत', 'संगम', 'दत्तू' व 'नाम्या' या आधिच्या ५ कथांचा समावेश करण्यात आलेला आहे.

बोरकरांनी 'कवितेची' वाट थोडा वेळ सोडून देऊन कथालेखन का केले असावे या प्रश्नाची संगती लावताना डॉ. भालचंद्र फडके यांनी नोंदवलेले मत पटण्यासारखे आहे. यासंदर्भात ते म्हणतात की, ''लेखकाला आपला जीवनानुभव गोचर करण्यासाठी एखादा 'वाङ्मयीन घाट' पुरेसा वाटत नाही. मग त्याला अन्य वाङ्मयप्राकर हाताळावासा वाटतो. बोरकरांचे कथालेखन याच भूमिकेतून झाले असावे''

मोजक्यांच कथा लिहूनही कथाकार बोरकर अशी पृथगात्म नाममुद्रा त्यांनी गोमंतकीय कथाविश्वावर उमटविली आहे. त्यांच्या कथा सुखटणकर-सरदेसाईंनी रुढ केलेल्या प्रादेशिक वळणाने जाणाऱ्या असल्या तरी त्यात आपल्या या श्रेष्ठ समकालिनांचे अनुकरण मात्र पहायला मिळत नाही. ही कथाकारागिरी

सर्वस्वी त्यांचीच आहे. परंतु त्यातल्या त्यात तिचे नाते सुखठणकरांच्या कथेशी अधिक जुळणारे आहे. त्यांची कथा मौखिक परंपरतेतून आलेली आहे. अनेक दंतकथांना व आख्यायिकांना त्यांनी कथारुप दिलेले आहे. आणि म्हणूनच ती वाचनीय असण्यापेक्षा श्रवणीयच अधिक आहे. त्यांच्या कथेत त्यामुळेच एखादे उपकथानक सहजपणे येऊन जाते आणि विशेष म्हणजे ते कुठे टोचत नाही. या दृष्टीने त्यांच्या 'सुताराची सून', 'देवीचे दान', 'ते कर मन्मानतेचे', 'समुद्रकाठची रात्र', या कथा पाहाता येतील. या बाबतीत त्यांच्या अनुभवविश्वाचा अनुबंध सुखटणकरांच्या अनुभवविश्वाशी असलेला जाणवतो.

त्यांच्या कथालेखनाविषयी डॉ. सोमनाथ कोमरपंत म्हणतात, " गोमंतक भूमीविषयीचे ममत्व हे बोरकरांच्या कथालेखनातील बीजभूत सामर्थ्य आहे. त्यांच्या सौंदर्योपासक मनाला गतकाळाची सय येते. येथील भूमी-मातीचे मार्दव त्यांच्या कथासृष्टीतून दृगोचर होते. येथील भूमी आणि माणसे यांच्या स्पंदनशीलतेतील आंतरिक नात्याचा ते तन्मयतेने शोध घेतात. येथील विश्रब्ध कुळागरातील शैत्याचा, माधुर्याचा, सौंदर्याचा त्याचप्रमाणे शुचित्वाचा त्यांना भारी लोभ, त्यांचे मानसपुत्र आणि मानसकन्या येथील नितान्त रमणीय निसर्गाच्या रुपकळेशी तादात्म्य होतात. बोरकरांच्या कथेतील निसर्गवर्णन केवळ वातावरण निर्मितीसाठी येत नाही. कथेतील व्यक्तिरेखांच्या आंतरिकतेशी ते सुसंगत असते."

त्यांच्या कथा या व्यक्तिकेंद्रित आहेत. त्यांतून अनेक घटना प प्रसंग ठासून भरलेले असले तरी त्या सगळ्यांचा रोख नायकाच्या चरित्रचित्रणावरच आहे. त्यांच्या या कथाविश्वातील व्यक्ती मनस्वी आहेत. त्यांनी आपापली मूल्ये जीवापाड जतन करून ठेवलेली आहेत. त्यांच्या निष्ठा, त्यांच्या श्रद्धा हाच त्यांचा जीवनाधार. त्यांची 'माणसे' ही एका विशिष्ट अर्थाने सश्रद्ध आहेत. अशी श्रद्धावान, चिंतनशील, मूल्यभाव असलेली माणसे त्यांच्या कथेतून आढळतात. 'संगम' मधील भाई, 'प्रियदर्शनी' मधील म्हातारा, 'घराण्याची अब्रु' मधील दाजीसाहेब 'पांघरूण' मधील अंतूभट, 'देवीचे दान' मधील विश्राम व श्रीधर भट, 'सोनकेळ' मधील शांतीगौरी 'ते कर मन्मानतेचे' मधील लक्ष्मी, 'लामणदिवा' मधील पुरुषोत्तमबाब, 'निरक्षराचा प्रश्न' मधील आंतोन अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. त्यांच्या कथेतील या 'माणसां' विषयी डॉ. प्रल्हाद वडेर म्हणतात, " बोरकरांच्या कथांतून लक्षात राहतात ती माणसे, प्रसंग फार क्वचित्. घराण्याचा विलक्षण अभिमान असणारी, परंपरांना जपणारी आणि जिद्दी व मानी अशी माणसे. त्यांच्या निष्ठा वेगळ्या आहेत. तशीच ध्येयेही आहेत. एका अर्थाने आजच्या जगात व आजच्या काळात ही माणसे 'आऊटसायडर' आहेत."

माणूस हाच चांगल्या कथेचा विषय असतो. चांगली कथा ही माणसाचीच असते. असली पाहिजे. माणूस हा भल्याबुऱ्याची मूर्ती असते. कथेतही तो तसाच असला पाहिजे. तरच तो हाडामासाचा वाटेल. त्यांच्यांतल्या केवळ चांगुलपणाचे चित्रण करुन एक तर 'देव' वाटेल किंवा वाईट प्रवृत्तीचे दर्शन घडवून तो 'राक्षस' वा 'पशू' तरी वाटेल. चांगल्या कथा लेखकाकडून ही अपेक्षा नसते. तसे झाले तर त्याचे जीवनविषयक आकलन अपुरे व उथळ म्हणावे लागेल. बोरकरांच्या काही कथांतून अशा जिवंत माणसाचे दर्शन घडते. 'पांघरूण' मधील अंतूभट 'घराण्याची अब्रू' मधील दाजीसाहेब, 'समुद्रकाठची रात्र' मधील लुइझा, 'ते कर मन्मातेचे' मधील लक्ष्मी ही अशा माणसांची उदाहरणे म्हणून सांगता येईल.

'पांघरुण' या कथेतील अंतूभट सर्वसामान्य माणसाचे जीवन जगत होता. त्यात तो मस्तही

होता. पण एक दिवस त्यांच्या जीवनात असा उजाडतो की तो त्याच्यातला माणसाची सत्वपरीक्षाच घेतो. आयुष्यभर ज्ञानेश्वरीच्या ओवीचा अर्थ उलगडत आलेला अंतूभट सत्प्रवृत्त, अनासक्त आपली पत्नी लक्ष्मी परपुरुषाच्या, गोंदूभटाच्या मिठीत गाढ झोपलेली पाहतो. पण चित्त विचलीत होऊ न देता आपली अंगावरची मानाची शाल त्या गाढ झोपलेल्या उभयतांवर अलगद हातांनी पसरवितो आणि निघून जातो. शब्द बंबाळ टाळून बोरकर नेमक्या आणि मोजक्याच शब्दांतून त्यांच्या मनातला संघर्ष परिणामकारकरित्या चित्रित करताना लिहितात, 'डोळ्यांत आशीर्वाद घेऊन पित्याने मुलीकडे पहावे तसे त्यांनी लक्ष्मीकडे पाहिले आणि ज्ञानेश्वरीची पोथी घेऊन ते सरळ स्टेशनवर चालते झाले. हा प्रसंग आणि या कथेतला 'अंतूभट' दीर्घकाळपर्यंत मनात रेंगाळत राहतो. कथेतील हा प्रसंग एकाचवेळी विलक्षण गती आणि उंचीही प्राप्त करुन देतो. वाचकाला अंतर्मुख करतो. वाचकाला एक चांगली कथा वाचल्याचे समाधान मिळवून देतो. या कथेच्या संदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ' कथेमध्ये एका मागोमाग एक घटना जेव्हा लेखक रंगवतो तेव्हा त्या घटनांची नुसती साखळी गुंफून चालत नाही. घटनेत जी स्फोटकता असते त्यामुळे पुढील घटनेला बसलेले हादरे जाणवले पाहिजेत. तरच कथा गतीमान होते आणि तिच्यातील चैतन्य वाचकाला अंतर्मुख करते. सामान्यतः मराठी कथा गतिशून्य असते. विशिष्ट अखेरी साधण्यासाठी घटनांची मांडामांड किंवा जुळवाजुळवी करीत राहणारे लेखक कथेच्या कारागिरीत कुशल असतात. पण अशा कथा मनात दीर्घकाळ रेंगाळत राहात नाहीत किंवा त्या पुनः पुनः वाचाव्या असे वाटत नाही.

कवी बोरकरांच्या कथेत काव्यात्मता नसली तरच नवल ! त्यांच्या काही कथांतून उत्कट काव्यात्मतेचा प्रत्यय येतो. 'प्रियदर्शनी', 'समुद्रकाठची रात्र', 'सोनकेळ', 'ते कर मन्मातेचे', 'आकाशाची दौलत' या कथातून काव्यात्मतेचा उत्कट अनुभव येतो. 'आकाशाची दौलत' या कथेची अखेर करतांना बोरकरांमधला कवी जागा झालेला दिसून येतो. ते लिहितात मनात दाटलेला सारा काळोख घननीळ होत चालला आहे आणि तोही नक्षत्राने फुलून निघत आहे. या अननुभूत साक्षात्काराने गोपिकाबाईच्या डोळ्यात सुखाचे हिरेमोती उभे राहिले.

डॉ. वडेरांनी बोरकरांच्या या कथांना 'संस्कार कथा' असे म्हटले असून त्यांचे नाते जुन्या कहाण्यांशी असल्याने ते सांगतात. त्यांच्या कथेची निवेदनपद्धती अजब आहे. त्यातील बहुतेक कथा कुणीतरी कुणाला तरी सांगितलेल्या आहेत. त्यातून कालानुक्रमाची साखळी तोडलेली असते. जुन्या कहाणीतली लयबद्धता त्यात आहे आणि तिच्यातून श्रोत्यांचे संस्कारित व्हावे ही भूमिका आहे. जुन्या कहाणीची नवनिर्मिती असलेली, संस्कारपेर्ती, कलात्मकतेचे कोंदण लाभलेली बोरकरांची ही कथा खऱ्या अर्थाने प्रादेशिक आहे, कारण इथली जीवनामूल्ये व स्वभावचित्रे यांच्याशी ती इतकी एकरुप झालेली आहे कि तिच्यातील माणसे दुसरीकडे कुठे रूजूच शकणार नाहीत.

आपल्या या कथालेखनासंबंधाने खुद्द बोरकरांनीच लिहून ठेवलेले आहे, (ही) कथासृष्टी जितकी माझी आहे तितकीच गोव्याचीही आहे. मुक्तिपूर्व गोवा आपल्या मूल्यांनिशी आणि सांस्कृतिक वारशानिशी तिच्यात उभा आर्हे. या कथा जितक्या गोव्याच्या आहेत तितक्याच त्या माणसांच्याही आहेत.

रुढ अर्थाने बोरकरांची कथा प्रादेशिक म्हणता येणार नाही. परंतु त्यांच्या कथांना

गोमंतकाच्यामातीचा दर्वळ आहे. मातीची ओढ ही सनातन भावना. माणसाचे आपल्या मातीशी अतूट नाते असते. बोरकरांच्या कथेसंदर्भात डॉ. भालचंद्र फडके म्हणतात की, 'गोव्याचा ध्यास, आपल्या देशाच्या मातीची ओढ ही बोरकरांच्या कथांची आदिम प्रेरणा आहे असे म्हणायला काहीच हरकत दिसत नाही.'

गोव्याच्या मुक्तिसंग्रामात बोरकर सक्रीय होते. गोवा मुक्तीचा सोहळाही त्यांनी अनुभवला, गोव्याच्या या उर्ज्वस्वल पर्वाचे चित्रण त्यांच्या काही कथांतून पहावयास मिळते. 'ते-कर मन्मातेचे' ही कथा याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून सांगता येईल. गोमंतभूच्या स्वातंत्र्यासाठी प्राणाची बाजी लावणाऱ्या तरुण मनांचे स्पंदन त्यांच्या अशा कथांतून जाणवते.

बोरकरांची लावण्यवती कविता चांदणवेली सारखी मन गुंतवून टाकते. त्यांची कथाही वाचकाला एका वेगळ्याच विश्वात घेऊन जाते. या विश्वातील व्यक्ती मनस्वी आहेत. त्यांनी आपापली मूल्ये जीवापाड जतन केलेली आहेत. आपल्या निष्ठा आपल्या श्रद्धा हाच त्यांचा जीवनाधार. (डॉ. फडके,) आणि यामुळेच त्यांच्या कथेत मनस्वी माणसे, देव-देवस्की, श्रद्धा कवटाळणाऱ्या लहानथोर व्यक्ती इत्यादींचे दर्शन घडते. त्यांच्याच बरोबरीने माडांच्या सावल्या, उगवती मावळतीची रंगसंगती, निरव समुद्र किनारे आणि त्यावर येऊन आदळणाऱ्या लाटा शीतल नि संपन्न कुळागरे, फिरंग्यांच्या आणि मुक्तिलढ्याच्या कडूगोड आठवणी यांचे त्यांच्या कथेतून घडून येणारे दर्शन वाचकाला गुंगवून टाकते. क्षणेक त्याला अद्‌भुताच्या वर्षावात न्हाऊ घालते.

मान्य आहे बोरकरांची कथा जुन्या चेहऱ्या मोहऱ्याची आहे. परंतु प्राय: सरळ रेषेत जाणारे कथानक, ठसठशीत व्यक्तिचित्रण, अद्‌भुताची गुढ तरल रंगसंगती आणि काव्यात्म निवेदनशैली इत्यादी तिच्या वैशिष्ठ्यांनी तिला वाचनीय बनविले आहे हे निश्चित.

**संदर्भ सूची :**


१. **आधुनिक गोमंतकीय मराठी साहित्याचे शिल्पकार** - बा. द. सातोस्कर.
२. **बा. भ. बोरकर : व्यक्ती आणि वाङ्मय** - प्रा. मनोहर हिरबा सरदेसाई.
३. **अनुभव आणि आकार** - प्रा. (डॉ.) प्रल्हाद वडेर.
४. **प्रतिबिंब** - प्रा. (डॉ.) सोमनाथ कोमरपंत
५. **प्रस्तावना** - समुद्राकाठची रात्र - बा. भ. बोरकर.
६. 'कथा'- डॉ. बाळकृष्णजी कानोळकर, **गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ ला.**
७. **मागोवा** - प्रा. रवींद्र घवी.


***'मतीनें, कृतीनें, उक्तीने निर्मळ / तेजाने उजळ करी जनां***
***हाच खरा कवी प्रीत पाझरवी / तेजें दिपे रवि, ईश्वर हा !***

***(बोरकरांची अखेरची कविता, २४ एप्रिल, १९८४)***